MHNG100020662019

**नियमीत दिवाणी दावा क्र. १०७/२०१९**
**विकास – विरुध्द – संजय**

**<u>निशाणी क्र. ५७ वर आदेश</u>**
**(पारित दिनांक ११.०२.२०२६ )**

अर्जाचे व खुलासा , तसेच अभिलेखाचे अवलोकन केले व युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्र. वादी क्र. १ यांनी, दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ अन्वये लेखी बयानात दुरूस्तीसाठी दाखल केला आहे. प्र. वादी यांचे थोडक्यात कथन की, वादी यांनी दाव्यात दुरुस्ती केली आहे, त्यामुळे प्र.वादी यांना दुरुस्ती करावयाची आहे. सबब, दुरुस्तीची परवानगी देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली.

३. वादी यांनी आक्षेप घेतला. अर्ज हा उशीराने विचार पुर्वक दाखल केला आहे. सबब अर्ज खारिज करावा अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन दाव्याचे अवलोकन केले. दावा हा आदेशात्मक व निरंतरच्या मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे. दाव्यामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकुमा अर्जावर न्यायालयाने दि. २२.०६.२०२२ रोजी आदेश पारित केल्याचे दिसुन येते. दावा यामध्ये दि. ०४.०७.२०२४ रोजी नि.क्र. ४९ अन्वये मुद्दे निश्चित करण्यात आले. त्यापुर्वी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक हि दि. ०२.११.२०२० रोजी नि.क्र. २५ अन्वये करण्यात आली. त्याचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर वादी यांनी दाव्यात दुरुस्ती केली. त्याबाबत न्यायालयाने दि. १३.०८.२०२५ रोजी आदेश पारित केला. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

**५.** मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

**७.** प्र. वादी यांना लेखी बयानात अनुषंगकि दुरुस्ती करावयाची आहे. त्यांना परिच्छेद ६अ नमुद करावयाचा आहे. लेखी बयानात मध्ये दुरुस्ती केल्यास मुळ बचावाच्या स्वरुपात बदल होणार नाही. या उलट दुरुस्ती ही आवश्यक आहे. अशा अभिलेखावरील परिस्थीतीवरुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे असे माझे मत नोंदवित आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्र. वादी क्र. १ यांना लेखी बयानात , अर्जात नमुद दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते आणि सदरची दुरूस्ती त्यांनी १४ दिवसांच्या आत करावी.

३. प्र. वादी यांनी पुढील तारखेच्या आत, (१४ दिवसांच्या आत) दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

RAJU BHASKAR DOLE
Judgment
Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.02.16 11:59:34 +0530

(रा.भा.डोळे)

दिनांक : ११.०२.२०२६. सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड.